**साखळी पध्दतीने सिमेंट नाला बांध (Checkdam) बांधणे : कामे गुणवत्ता पूर्ण होण्यासाठी घ्यावयाची दक्षता**

महाराष्ट्र शासन
शासन परिपत्रक : जलसं-२०१२/प्र.क्र.६५/जल-७
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २२ जानेवारी,२०१३

वाचा : ग्राम विकास व जलसंधारण विभाग,

१. शासन निर्णय, समक्रमांक दिनांक २९ मे,२०१२ व १६ ऑगस्ट,२०१२,
२. शासन निर्णय क्रमांक राकृयो-२०१२/प्र.क्र.१४२/जल-७, दिनांक १० डिसेंबर,२०१२,
३. कृषि आयुक्तालयाचे पत्र क्र.मृदसं/मृद-६/सिनाबां/कॉंक्रीट/मां.सु./१५८०/२०१२, दिनांक २६ जून,२०१२,
४. कृषि आयुक्तालयाचे पत्र क्र.मृदसं/मृद-६/सिनाबां/कॉंक्रीट/मां.सु./१७३९/२०१२, दिनांक १० जुलै,२०१२,
५. कृषि आयुक्तालयाचे पत्र क्र.मृदसं/मृद-६/सिनाबां/कॉंक्रीट/मां.सु./२२२३/२०१२, दिनांक १३ सप्टेंबर,२०१२,

**शासन परिपत्रक :**

राज्यात पाणलोट विकास कार्यक्रमांतर्गत मृद व जलसंधारणाची कामे विविध योजनेतून प्रकल्पाधारीत पध्दतीने राबविण्यात येत आहेत. तसेच साखळी पध्दतीने सिमेंट नालाबांध (Checkdam) बांधण्याचा कार्यक्रम राज्यस्तर व राष्ट्रीय कृषि विकास योजनेतून राबविण्यात येत आहे. सिमेंट नाला बांध हा उपचार घेताना कशा प्रकारे कामे करावीत व दक्षता घ्यावी या संदर्भात मार्गदर्शक सूचना आयुक्त स्तरावरुन निर्गमित केल्या आहेत. राज्यातील दुष्काळ सदृश परिस्थिती विचारात घेता हा महत्वाकांक्षी कार्यक्रम यशस्वी होण्याच्या दृष्टीने खालीलप्रमाणे दक्षता घेण्यात यावी.

**बांधकाम :**

१. **मिक्सर व व्हायब्रेटर :** कॉंक्रीट मधील साहित्याचे (सिमेंट, वाळू, पाणी, लोखंडी गज) प्रमाण व दर्जा योग्य असावा. कॉंक्रीट टाकताना मिक्सर (Mixer) :सर्व घटक+पाणी यांचे एकजीव मिश्रण करण्याकरिता व व्हायब्रेटर(Vibrator) : संधानकातील Air voids काढणे व Honeycombing टाळून बांधकामाची अपेक्षित मजबुती व गुणवत्ता साध्य करण्याकरिता वापर करावा.

२. **पाणी टाकणे (Curing) :** सिमेंट नाला बांधाचे (Checkdam) बांधकाम केल्यानंतर बांधकामास Curing **व्यवस्थित करावी त्यासाठी कमीत कमी २१ दिवस पाणी मारावे.** तसेच बांधकामावर ओलावा राहण्यासाठी बांधकामावर पोती/ गोणपाट अंथरुन पाणी मारावे.

३. **नाम फलक** : सिमेंट नालाबांधाच्या फ्लॅंक वॉल वर आईल पेंटने खालील मजकूर असलेला फलक लिहावा :

**महाराष्ट्र शासन**
**जलसंधारण विभाग**

कामाचे नांव : सिमेंट नालाबांध गट क्र.: पाणलोट क्र.:
योजनेचे नांव : मंजूर रक्कम : रु.
कामावरील एकूण खर्च : रु.
काम सुरु झाल्याचा दिनांक : काम पूर्ण दिनांक :
पाणीसाठा : टीसीएम
यंत्रणेचे नांव :

४. **तपासणी** : कृषि व लघुपाटबंधारे यंत्रणांनी विभागाच्या तपासणीच्या (Inspection Norms) प्रचलित नियमानुसार कामाची तपासणी करावी. याशिवाय या कामांची तपासणी संबंधित जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, उपायुक्त (विकास) यांनी स्वैरपध्दतीने (Random) करावी.

२. सदर शासन परिपत्रक, महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०१३०१२२१२३२२१३२६ आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

( सुनील चव्हाण )
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
मा. राज्यपाल यांचे खाजगी सचिव,
मा.मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
मा.उपमुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
मा. मंत्री (जलसंधारण) यांचे खाजगी सचिव
मा. राज्यमंत्री,(जलसंधारण) यांचे खाजगी सचिव
मुख्य सचिव यांचे सचिव,
सर्व अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालयीन विभाग,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व उपायुक्त (विकास), विभागीय आयुक्तांचे कार्यालय
आयुक्त (कृ षि), महाराष्ट्र राज्य, पुणे,
प्रधान मुख्य वनसंरक्षक व महासंचालक, सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, महाराष्ट्र राज्य, पुणे

मुख्य अभियंता,लघु पाटबंधारे (स्थानिक स्तर),पुणे,
संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
सर्व अतिरिकत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
सर्व विभागीय कृषि सहसंचालक,
सर्व अधीक्षक अभियंता ल.पा. (स्था.स्तर)
संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई,
महासंचालक, माहिती व जनसंपर्क, मुंबई (प्रसिध्दी करीता),
सर्व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी,
महालेखापाल, (लेखापरीक्षा), महाराष्ट्र १ व २ , मुंबई व नागपूर,
महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता),महाराष्ट्र १ व २ , मुंबई व नागपूर,
सर्व मंत्रालयीन विभाग,
सर्व सहसचिव /उप सचिव/अवर सचिव/कार्यासन अधिकारी (जलसंधारण विभाग) / निवडनस्ती-जल-७